**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८०/२०२३ मध्ये निशाणी क्र. ४४ कडील अर्जावर आदेश.</u>**

१) अर्ज वाचला. म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांतील विद्वान वकीलांना ऐकले. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२) अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. ४ ने निशाणी क्र. ४० कडे त्यांच्याविरुद्धचा विना कैफीयत प्रकरण चालविण्याचा आदेश रद्द करुन मिळण्यासाठी दाखल केलेला अर्ज खर्चाच्या अटीवर मंजुर झाला आहे. त्यानुसार प्रतिवादी क्र. ४ यांनी खर्चाची रक्कम न्यायालयात जमा केली आहे. त्यामुळे वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन कैफीयत दाखल करण्यास परवानगी मिळण्याबाबत प्रस्तुत अर्जात केलेली विनंती मंजुर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येतो व त्यानुसार निशाणी क्र. १ वर दिनांक ०६/०७/२०२३ रोजी प्रतिवादी क्र. ४ विरुध्द पारीत केलेला प्रस्तुत दावा विना कैफियत चालविण्याबाबतचा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. ४ यास कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.09.26 17:43:08 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– २६/०९/२०२४ २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.